**MHRG**110004292017

<u>नियमित दिवाणी दावा क्र. ६२/२०१७ मधील निशाणी क्र. २४ वरील आदेश</u>
<u>(पारीत दिनांक १४.०७.२०२३)</u>

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादीने रेसज्युडीकेटा या तत्वाची बाधा येत असल्यामुळे दावा काढुन टाकण्यासाठी सादर केला आहे.

२. प्रतिवादीने प्रस्तुत अर्जामध्ये नमुद केले की, वादींविरुध्द मा. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, माणगांव यांचे न्यायालयात रे. मु. क्र. ५६/१९८२ दाखल केलेला होता. सदरचा दावा मा. न्यायालयाने मंजुर केल्यानंतर वादी मार्फत मा. जिल्हा न्यायाधीश, अलिबाग यांचेकडे पहिले अपील क्र. ११/१९९२ दाखल करण्यात आले. सदरचे अपील फेटाळल्यानंतर वादी मार्फत मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडे दुसरे अपील दाखल केले व सदरचे अपीलही फेटाळण्यात आले. त्यानंतर प्रतिवादी मार्फत या मा. न्यायालयाच्या निकालाची अंमलबजावणी करण्याकरिता रे. द. क्र. २०/२००२ दाखल करण्यात आली व या दरखास्तीमध्ये मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे ताबा वॉरंटचा आदेश करण्यात आला. या आदेशाविरुध्द वादींनी मा. उच्च न्यायालयामध्ये दिवाणी रिव्हीजन अर्ज क्र. ८४६/२०१२ दाखल केला. सदरचा रिव्हीजन अर्जही फेटाळण्यात आलेला आहे व त्यानुसार मा. न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे ताबा देण्यात आलेला आहे. वादींनी सदरच्या दाव्यामध्ये मुद्दा क्र. १० मध्ये वादींनी १६४ चौ. मी. क्षेत्रफळामध्ये अतिक्रमण केलेले होते ही बाब निःसंशयपणे सिध्द केलेली नाही असे कथन यापुर्वी मा. न्यायालयाच्या दिलेल्या आदेशावर भाष्य केलेले आहे व ताबा परत मिळण्याची मागणी केलेली आहे.

३. वादींनी सदर दाव्याकामी जे मुद्दे उपस्थीत केलेले होते ते मुद्दे हे दरखास्तकामी व मा. मुंबई उच्च न्यायालयामध्ये दाखल असलेल्या प्रकरणामध्ये उपस्थीत केलेले होते. त्या सर्व मुद्दयांचा व वादी प्रतिवादींमधील वादाचे कायमस्वरुपी निराकरण

केलेले आहे. त्यामुळे याच मिळकतीमध्ये व याच पक्षकारांमध्ये रेस ज्युडीकेटा या न्यायतत्वाची बाधा येत आहे. मा. न्यायालयशच्या आदेशानुसार प्रतिवादींकडुन अतिक्रमणित क्षेत्राचा ताबा हा वादींना मिळालेला आहे. मात्र, केवळ आता वादींनी प्रतिवादींस त्रास देण्यासाठी सदरचा दावा दाखल केलेला आहे. मात्र सदरचा दावा रेस ज्युडीकेटा या न्यायतत्वाखाली चालु शकत नाही. तसेच, वरिष्ठ न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे ताबा दिला गेला असल्याने तो ताबा काढुन घेण्याचा या मा. न्यायालयास हक्क अधिकार नाही. प्रतिवादीने पुढे नमुद केले की, आदेश ७ नियम ११ अन्वये दाखल केलेला अर्ज तांत्रीक कारणांमुळे फेटाळला आहे. प्रस्तुत दाव्याबाबत अंतिम निकाल झालेला आहे. म्हणुन प्रस्तुतचा अर्ज मंजुर होवुन दावा रद्द करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

४. वादींनी त्यांचे म्हणणे सादर करुन अर्जास विरोध दर्शविला आहे. वादींनी नमुद केले की, यापुर्वी निशाणी क्र. १३ वरील याच मागणीचा अर्ज मा. न्यायालयाने फेटाळला आहे. तसेच, निशाणी क्र. ०१ वर आदेश पारीत करुन दाव्याच्या पात्रतेबाबत मुद्दा काढण्यात आलेला आहे. सदर मुद्दयावर पुरावा देणे महत्वाचे आहे. सदरचा अर्ज बेकायदेशीर असुन तो फेटाळण्यात यावा अशी वादींनी विनंती केली आहे.

५. येथे ही नमुद करणे महत्वाचे आहे की, प्रस्तुत प्रकरणातील प्रतिवादीच्या कथनांनुसार रे. मु. क्र. ५६/१९८१ हा दावा प्रस्तुत दाव्यातील दावा मिळकतीबाबतचा असुन प्रस्तुत दावा मिळकतीबाबतच्या मालकी हक्काबाबत मा. न्यायालयाने न्यायनिर्णय दिलेकला आहे. सदरच्या न्यायानिर्णयाविरुध्द करण्यात आलेले अपील व रिव्हीजन पिटीशन मा. न्यायालयाने फेटाळलेले आहे. येथे ही बाब नमुद करणे महत्वाचे आहे की, अभिलेखावरील न्यायानिर्णय व इतर दस्तऐवजांवरुन दिसुन येते की, रे. मु. क्र. ५६/१९८१ चा दावा हा घोषणेकरिता, अतिक्रमण काढुन टाकण्याकरिता व निरंतर ताकीदीच्या मनाईकरिता दाखल करण्यात आला होता. सदर दाव्यामध्ये वादींनी मागणी मागितली होती की, सी. टी. एस. क्र. ५५८, ५५९ व सी. टी. एस. क्र. ५६० च्या मिळकतीपैकी १६४ चौ. मीटरची हया मिळकती वादीच्या मालकीची असल्याचे घोषित करण्यात यावे. रे. मु. क्र. ५६/१९८१ हा दावा मंजुर करण्यात आला. त्या दाव्यातील वादी हे सी. टी. एस. क्र. ५५८, ५५९ व सी. टी. एस. क्र. ५६० च्या मिळकतीपैकी

१६४ चौ. मीटर च्या मिळकतीचे मालक असल्याचे घोषित करण्यात आले.

६. प्रस्तुतचा दावा हा घोषणेकरिता व निरंतर ताकीदीकरिता दाखल करण्यात आलेला आहे. प्रस्तुत दाव्यामध्ये वादींनी मागणी केली आहे की, सि. टी. एस. क्रमांक ५६० चे एकुण क्षेत्रफळ ४८२.२ क्षेत्रफळापैकी ३३१.११ चौ. मीटर एवढया क्षेत्राची मालकी वादींची असल्याची घोषित करण्यात यावे.

७. येथे नमुद करणे आवश्यक आहे की, रेसज्युडीकेटा तत्व लागु होण्यासाठी खालील बाबींची पुर्तता होणे आवश्यक आहे.

अ दोन दावे उपस्थित असणे आवश्यक आहे, त्यामध्ये एक दावा निकाली लागलेला असावा व दुसरा दावा प्रलंबित असावा.

ब पक्षकार किंवा त्यांचे प्रतिनिधी दोन्ही दाव्यात समान असावे.

क कृतीचे कारण एकच असावे.

ड दाव्याचे शिषर्क समान असले पाहिजे.

इ ज्या न्यायालयात पुर्वीचा खटला चालविला गेला होता, ते न्यायालय सक्षम असणे आवश्यक आहे.

फ पुर्वीच्या दाव्यात गुणवत्तेवर न्यायानिर्णय झालेला असला पाहिजे.

८. येथे ही बाब नमुद करणे अत्यंत आवश्यक आहे की, प्रस्तुतचा दावा हा सि. टी. एस. क्र. ५६० च्या एकुण क्षेत्रफळ ४८२.२ क्षेत्रफळापैकी ३३१.११ चौ. मीटर एवढया क्षेत्राची मालकी असल्याची घोषित करण्यात यावे याकरिता व निरंतर ताकीदीच्या मनाई हुकुमाकरिता सादर केलेला आहे. रे. मु. क्र. ५६/१९८१ मध्ये सी. टी. एस. क्र. ५५८, ५५९ व सी. टी. एस. क्र. ५६० च्या मिळकतीपैकी १६४ चौ. मीटर हया मिळकती वादीच्या मालकीची असल्याचे घोषित करण्यात यावे अशी मागणी मागितली होती. रे. मु. क्र. ५६/१९८१ मधील वादी हे सी. टी. एस. क्र. ५५८, ५५९ व सी. टी. एस. क्र. ५६० च्या मिळकतीपैकी १६४ चौ. मीटर च्या मिळकतीचे मालक असल्याचे घोषित करण्यात आले.

९. प्रस्तुत दाव्यामध्ये वादींनी नमुद केले की, दिनांक २८.१२.२०१६ रोजी कथित १६४ चौ. मीटर क्षेत्राचा ताबा वादींकडुन प्रतिवादीने घेतला व वादींची सि. टी. एस. क्र. ५६० मधील ३३१ चौ. मीटर एवढया क्षेत्रफळावरील मालकी नाकारली आहे. म्हणुन सदरचे प्रकरण दाखल करण्यात आले आहे. वादींच्या कथनांनुसार दावा दाखल करण्यास कारण हे दिनांक २८.१२.२०१६ रोजी घडले आहे.

१०. रे. मु. क्र. ५६/१९८१ मध्ये सि. टी. एस. क्र. ५५८, ५५९ व ५६० च्या मिळकतीपैकी उत्तर बाजुकडील १६४ चौ. मीटर मिळकतीबाबत मागणी होती. येथे ही बाब नमुद करणे आवश्यक आहे की, सि. टी. एस. क्र. ५६० मधील १६४ चौ. मीटर व्यतिरिक्त असलेली मिळकत ही प्रस्तुत दाव्यातील दावा मिळकत आहे. प्रस्तुत दाव्यातील वादींचे असे कथन आहे की, सि. टी. एस . क्र. ५६० मधील १६४ व्यतिरिक्त असलेल्या ३३१.११ चौ. मीटर क्षेत्रफळाची मालकी वादींनी दिनांक २८.१२.२०१६ रोजी नाकारली असल्यामुळे दावा दाखल करण्यास कारण घडले आहे. यावरुन स्पष्ट होते की, रे. मु. क्र. ५६/१९८१ चे कारण व प्रस्तुत दावा दाखल करण्याचे कारण हे भिन्न–भिन्न असुन दावामिळकत देखील वेगवेगळी आहे. वरील सर्व बाबींचा एकत्रीतरित्या बारकाईने विचार केला असता, मी या निष्कर्षाला आलो आहे की, प्रतिवादीचा अर्ज नामंजुर होण्यास पात्र आहे. सबब, मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## <u>आ दे श</u>

निशाणी क्र. २४ वरील अर्ज नामंजुर करण्यात येतो.

GAJANAN CHANDRAKANT FULZALKE

Digitally signed by GAJANAN CHANDRAKANT FULZALKE
Date: 2023.07.14 15:16:48 +0530

माणगांव,
दिनांक – १४.०७.२०२३

(जी. सी. फुलझेळके)
सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, माणगांव